**रे.दि.मु.क्र.३१/२०२०**
(महेश विरुध्द सुरेश)

**आदेश नि.६३ खाली**
(CNR No.MHRT-070006812020)
(आदेश पारीत दि.०१/०२/२०२४)

वादीने सदरचा अर्ज **दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ आदेश ६ नियम १७** नुसार वादपत्र दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी या विनंतीन्वये दाखल केला आहे.

**वादीचे कथन –**

२. प्रस्तुतचा दावा हा वाद मिळकतीचा ताबा व तद्अनुषंगीक दाद म्हणून ताकिदीसाठी दाखल केलेला आहे. वादीपत्रामध्ये परिच्छेद क्र.४ मधील २१ व्या ओळीमध्ये ''दोन सदनिका'' हा शब्दप्रयोग वादीतर्फे दावा दाखल करतेसमयी नजर चुकीने करण्यात आलेला आहे. त्या ठिकाणी ''तीन सदनिका'' असा उल्लेख असणे अपेक्षीत आहे. सबब सदरची चूक ही तांत्रीक स्वरुपाची आहे व वादीने ती जाणीव पुर्वक केलेली नाही. तसेच दुरुस्ती मंजूर झाल्याने प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही व दाव्याचे स्वरुप देखील बदलणार नाही. तरी सदरची दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती वादीने केलेली आहे.

**प्रतिवादी क्र.१ ते ५ चे म्हणणे (नि.६३)–**

३. अर्ज हा खोटा व खोडसाळ असून तो फेटाळण्यास पात्र आहे. अर्जामधील नमुद दुरुस्ती वादीस मागता येणार नाही. दुरुस्ती करण्यास परवानगी दिल्याने दाव्याचे मूळ स्वरुप बदलणार आहे. प्रस्तुतचा दावा हा सन २०२० मध्ये दाखल केला आहे. त्यामुळे प्रस्तुतची दुरुस्ती मंजूर करणे उचित राहणार नाही. सदरची दुरुस्ती मंजूर झाल्यास प्रतिवादीचे कधीही व कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सबब वर नमुद कारणांचा विचार करुन अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती प्रतिवादीने केलेली आहे.

४. अर्जाचे, प्रतिवादी यांनी दिलेल्या म्हणण्याचे व अभिलेखाचे अवलोकन केले. उभय पक्षकारांतर्फे युक्तीवाद ऐकला.

५. **दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे आदेश ६ नियम १७** अन्वये न्यायालयास योग्य वाटेल त्या अटी व शर्तींवर वादपत्र दुरुस्ती करण्याबाबतची परवानगी देण्याबाबतचे अधिकार न्यायालयास देण्यात आलेले आहेत.

६. अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीस वादपत्रामधील कलम ४ मधील २१ व्या ओळीमध्ये ''दोन सदनिका'' ऐवजी ''तीन सदनिका'' असा उल्लेख करायचा आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीचा उलट तपास चालू होवून दाव्याची संपरीक्षा आजमितीस चालू झालेली नाही. त्यामुळे वादीस वर नमुद मजकूर वादपत्रामध्ये समाविष्ट करणे आवश्यक वाटत असेल तर सदरचा मजकूर समाविष्ट करण्यास परवानगी देणे उचित राहिल. तसेच प्रस्तुतच्या दुरुस्तीमुळे वादीने याकामी मागितलेला अंतिम अनुतोष व दाव्याचे स्वरुप बदलणारे नाही. त्यामुळे वादपत्रामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी देणे उचित राहिल.

७. तसेच सदरची परवानगी देत असताना प्रतिवादीस याकामी झालेल्या खर्चाचा देखील विचार करणे आवश्यक आहे. सबब वरील सर्व कारणांचा विचार करुन मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे–

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने प्रतिवादी क्र.१ ते ५ यांना एकत्रीतरित्या रक्कम रु.५००/– खर्च म्हणून देण्याचे अटीवर अर्जामधील नमुद दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात येते.

३. वादपत्रामध्ये दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत वादीने पुढील तारखे पर्यन्त अभिलेखावर सादर करावी.

४. सदर आदेशाची पुर्तता वादीने पुढील तारखेस करावी.

दिनांक ०१/०२/२०२४. (एम.आर. काळे)

सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर,

चिपळूण.